**सुमोटो जनहित याचिका क्र. ०१/२०२६ अनुपालनासाठी नोडल अधिकारी नियुक्ती, २४x७ तक्रार निवारण कक्ष व प्रभागनिहाय भरारी पथके स्थापन करणे व इतर उपाययोजनाबाबत.**

# मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

कार्यालय :- मालेगाव महानगरपालिका, मालेगाव.
जा.क्र. मामनपा/ सं.क.व.वि./ २८७/२०२६
दिनांक :- ०६/११/२०२६

**मा. उच्च न्यायालय प्रकरण — अति महत्त्वाचे**

**आदेश :-**

**वाचा :-** १. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे सुमोटो जनहित याचिका क्र. ०१/२०२६ मधील दि. २१/०९/२०२६, २२/०९/२०२६, १५/१०/२०२६, २१/१०/२०२६, २६/१०/२०२६ व ०३/११/२०२६ रोजीचे आदेश.

२. मा. सर्वोच्च न्यायालय, रिट याचिका (C) क्र. ७२८/२०१५ मधील दि. २९/१०/२०२६ रोजीचे आदेश.

३. नगर विकास विभाग, कक्ष अधिकारी (नवि-१७) यांचे पत्र क्र. एमयुएम-२०२६/प्र.क्र.५१३/नवि-१७, दि. ०६/११/२०२६.

४. नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांचे पत्र क्र. नपप्रसं/ध्वनी प्रदूषण SMPIL01/2026/2026/का-६/२५६६१५९, दि. ०६/११/२०२६.

उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील सुमोटो जनहित याचिका क्र. ०१/२०२६ (सण-उत्सवांच्या काळातील ध्वनीक्षेपक व फटाक्यांमुळे होणारे वायू व ध्वनी प्रदूषण नियंत्रण) मध्ये मा. उच्च न्यायालयाने सार्वजनिक रस्ते, गल्ल्या, पदपथ व चौकांमध्ये फटाके फोडण्यावर संपूर्ण बंदी, शांतता क्षेत्रांचे संरक्षण, विनापरवाना ध्वनीक्षेपक / साऊंड सिस्टीमवर कारवाई, नोडल अधिकारी व २४x७ तक्रार निवारण कक्ष स्थापन करणे तसेच व्यापक जनजागृती करणे याबाबत सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश दिलेले आहेत.

मा. उच्च न्यायालयाने सदर निर्देश सर्व सण-उत्सवांना लागू केले असून दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे तंतोतंत पालन करणे कायदेशीररीत्या बंधनकारक असल्याचे नमूद आहे. करिता याकामी मालेगाव महानगरपालिका कार्यक्षेत्रासाठी नोडल अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त (कर) यांची

नियुक्ती करण्यात येत असून, २४x७ तक्रार निवारण कक्षाची जबाबदारी अग्निशमन अधीक्षक, मुख्य अग्निशमन केंद्र व सर्व प्रभाग अधिकारी यांच्यावर सोपविण्यात येत आहे. तसेच नोडल अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली खालीलप्रमाणे प्रभागनिहाय भरारी पथके स्थापन करण्यात येत आहेत :-

**अ) नोडल अधिकारी :-**

| नाव | पदनाम | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| श्री. नवल सोमा खैरनार | प्रभारी सहाय्यक आयुक्त (कर) | ८४५९३५६८१२ |

**ब) २४x७ तक्रार निवारण कक्ष :-**

| | |
|---|---|
| **तक्रार कक्ष** | अग्निशमन अधीक्षक, मुख्य अग्निशमन केंद्र व सर्व प्रभाग कार्यालये, मालेगाव महानगरपालिका |
| **हेल्पलाईन क्रमांक** | (०२५५४) २३४५६७ |
| **मुख्य ई-मेल आयडी** | mlgmmc@gmail.com |

**क) प्रभागनिहाय ई-मेल आयडी व भरारी पथके :-**

| प्रभाग | प्रभाग अधिकारी / भरारी पथक प्रमुख | ई-मेल आयडी | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|
| प्रभाग क्र. ०१ | बळवंत बाविस्कर | wo.mmc1@gmail.com | ८४२११९३१७० |
| प्रभाग क्र. ०२ | संतोष गायकवाड | mmcofficen002@gmail.com | ९९६०१५९७०२ |
| प्रभाग क्र. ०३ | जगदीश बडगुजर | w3.mlgmmc@gmail.com | ८१८०८१३९५२ |
| प्रभाग क्र. ०४ | कादरी अब्दुल अलीम | w04.mmc@gmail.com | ९२७२७३२१३२ |
| मुख्य अग्निशमन केंद्र | संजय दादाजी पवार | chieffireofficermmc@gmail.com | ९८२३३३९२७५ |

**संदर्भ क्र. १ ते ४ नुसार प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | निर्देश | संबंधित अधिकारी / विभाग प्रमुख |
|---|---|---|
| १. | 1. २४x७ तक्रार निवारण कक्ष, हेल्पलाईन व प्रभागनिहाय ई-मेल आयडीवर प्राप्त तक्रारींचे संनियंत्रण करावे व त्यांचा तात्काळ निपटारा होईल याची खात्री करावी.<br>2. संबंधित / स्थानिक पोलीस प्रशासन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याशी समन्वय साधून संयुक्त मोहिमा राबवाव्यात.<br>3. भरारी पथकांकडून दैनंदिन कारवाईचा अहवाल (तक्रारी, जप्त मुद्देमाल, दंड रक्कम) संकलित करावा.<br>4. संचालनालयाने विहित केलेल्या नमुन्यातील (भाग १ ते ४) माहिती पुराव्यांसह विहित मुदतीत सादर करावी. | **सहाय्यक आयुक्त (कर) तथा नोडल अधिकारी यांचे कार्यालय** |
| २. | 1. २४x७ तक्रार निवारण कक्ष कार्यान्वित ठेवावा. कक्षात प्राप्त प्रत्येक तक्रारीची नोंद तक्रार निवारण रजिस्टरमध्ये (दिनांक, वेळ, तक्रारदाराचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक, घटनेचे ठिकाण, तक्रारीचे स्वरूप व केलेली कार्यवाही) घ्यावी.<br>**2.** तक्रार तात्काळ संबंधित प्रभाग भरारी पथकाकडे व पोलीस नियंत्रण कक्षाकडे वर्ग करावी व कार्यवाहीचा दैनंदिन अहवाल नोडल अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावा. | **अग्निशमन अधीक्षक, मुख्य अग्निशमन केंद्र** |
| ३. | 1. आपल्या प्रभागात सार्वजनिक रस्ते, पदपथ, चौक व शांतता क्षेत्रांमध्ये (रुग्णालये, शाळा-महाविद्यालये, न्यायालये, धार्मिक स्थळे व विशेष घोषित ठिकाणांच्या १०० मीटर परिघात) भरारी पथकामार्फत गस्त घालावी.<br>**2.** नियमभंग करणाऱ्यांवर पोलिसांच्या सहकार्याने जप्ती व दंडात्मक कारवाई करावी आणि दैनंदिन अहवाल नोडल अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावा. | **प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र. ०१, ०२, ०३ व ०४** |
| ४. | 1. कार्यक्षेत्रातील रुग्णालये व शाळा-महाविद्यालयांची यादी (शांतता क्षेत्रे) तात्काळ नोडल अधिकारी यांच्या कार्यालयात | **आरोग्य विभाग व** |

| | | |
|---|---|---|
| | सादर करावी.<br>**2.** मनपा व खाजगी शाळांमध्ये हरित फटाके प्रतिज्ञा व प्रबोधन कार्यक्रम आयोजित करावेत आणि घेतलेल्या कार्यक्रमांची संख्या व छायाचित्रांसह अहवाल तात्काळ नोडल अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावा. | **शिक्षण विभाग** |
| ५. | 1. तक्रार कक्ष, हेल्पलाईन व ई-मेल आयडी स्थानिक वृत्तपत्रे, मनपा संकेतस्थळ व अधिकृत सोशल मीडियावर प्रसिद्ध करावेत आणि वृत्तपत्र कात्रणे, संकेतस्थळ लिंक व सोशल मीडिया पोस्ट / रील्सची संख्या तात्काळ नोडल अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावी.<br>**2.** शहरातील प्रमुख चौक व झोपडपट्टी भागात ध्वनीक्षेपकाद्वारे जनजागृतीपर घोषणा कराव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ नोडल अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावा. | **जनसंपर्क / माहिती तंत्रज्ञान विभाग** |
| ६. | 1. मुख्य भांडारपाल व जनसंपर्क / माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी संयुक्तिकरित्या मा. उच्च न्यायालयाच्या सुमोटो जनहित याचिका क्र. ०१/२०२६ अनुषंगाने फटाके व ध्वनी प्रदूषणाबाबत जनजागृती फलक (बॅनर बोर्ड) चा मराठी व उर्दू भाषेतील मजकूर व आराखडा निश्चित करावा.<br>2. मालेगाव शहरातील मुख्य रस्ते, प्रमुख चौक, जुने व नवीन बस स्थानक, मोसम पूल व तात्पुरत्या फटाके विक्री स्टॉल परिसरात लावण्यासाठी आवश्यक संख्येत बॅनर बोर्ड संयुक्तिकरित्या तात्काळ तयार करून घ्यावेत.<br>3. तयार केलेले बॅनर बोर्ड प्रभागनिहाय आवश्यकतेनुसार संबंधित प्रभाग अधिकारी यांच्याकडे तात्काळ सुपूर्द करावेत.<br>**4.** प्रभाग अधिकारी यांच्याशी समन्वय साधून सर्व ठिकाणी बॅनर बोर्ड लावले गेल्याची खात्री करावी व प्रभागांकडून प्राप्त GPS छायाचित्रे एकत्रित करून (PDF व लिंकसह) संयुक्त अहवाल नोडल अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावा. | **मुख्य भांडारपाल व जनसंपर्क / माहिती तंत्रज्ञान विभाग (संयुक्तिकरित्या)** |

| | | |
|---|---|---|
| ७. | 1. मुख्य भांडारपाल व जनसंपर्क विभाग यांच्याकडून प्राप्त बॅनर बोर्ड आपल्या प्रभागातील मुख्य रस्ते, प्रमुख चौक, बस स्थानक व गर्दीच्या ठिकाणी तात्काळ लावावेत.<br>2. लावलेल्या बॅनर बोर्डची GPS छायाचित्रे घेऊन ठिकाणनिहाय यादीसह अहवाल तात्काळ जनसंपर्क विभाग व नोडल अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावा.<br>3. सदर जनहित याचिका मा. उच्च न्यायालयात प्रलंबित असेपर्यंत लावलेले बॅनर बोर्ड त्याच ठिकाणी कायम ठेवावेत. बॅनर फाटल्यास, काढल्यास अथवा खराब झाल्यास ते तात्काळ बदलून घ्यावेत.<br>**4.** लावलेल्या बॅनर बोर्डची नियमित देखरेख करण्याची जबाबदारी संबंधित प्रभाग अधिकारी यांची राहील. | **प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र. ०१, ०२, ०३ व ०४** |
| ८. | 1. काही तात्पुरते फटाके विक्रेते संकीर्ण कर वसुली विभागाचा ना-हरकत दाखला (NOC) न घेता व लिलावानुसार विहित शुल्क न भरता थेट अग्निशमन विभागाची परवानगी घेऊन व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा महसूल बुडत आहे.<br>2. सबब, तात्पुरत्या फटाके विक्रीचा परवाना / परवानगी देण्यापूर्वी अग्निशमन विभागाने संकीर्ण कर वसुली विभागाकडून ना-हरकत दाखला दिलेल्या व्यापाऱ्यांची अद्ययावत यादी प्राप्त करून घ्यावी.<br>3. संकीर्ण कर वसुली विभागाने ना-हरकत दाखले व महानगरपालिकेच्या पावतीद्वारे भरलेल्या शुल्काची तपासणी करून दिलेल्या यादीतील तात्पुरत्या फटाके विक्रेत्यांनाच अग्निशमन विभागाने नियमानुसार तपासणी करून परवाना / परवानगी देण्याची पुढील कार्यवाही करावी.<br>4. संकीर्ण कर वसुली विभागाचा ना-हरकत दाखला नसलेल्या कोणत्याही तात्पुरत्या फटाके विक्रेत्यास अग्निशमन विभागाकडून परवाना / परवानगी देण्यात येऊ नये. ही जबाबदारी अग्निशमन विभागाची आहे.<br>5. परवाना / परवानगी देताना मा. उच्च न्यायालयाच्या सुमोटो | **अग्निशमन विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | जनहित याचिका क्र. ०१/२०२६ मधील आदेशान्वये "केवळ हरित फटाक्यांचीच (Green Crackers) विक्री करावी व स्टॉलवर जनजागृती फलक लावावा" अशी अट परवान्यात नमूद करूनच परवाने द्यावेत.<br>6. यापूर्वी दिलेल्या सर्व परवान्यांची संकीर्ण कर वसुली विभागाच्या यादीशी तात्काळ पडताळणी करावी. ज्या तात्पुरत्या फटाके विक्रेत्यांनी महानगरपालिकेचे शुल्क भरलेले नाही, त्यांना दिलेल्या परवान्यांबाबत नियमानुसार कार्यवाही करावी व तसा अहवाल नोडल अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावा.<br>7. यापूर्वी परवाने दिलेल्या सर्व फटाके विक्रेत्यांना हरित फटाके विक्री व जनजागृती फलकाबाबत तात्काळ लेखी नोटीस / पत्र बजावून अनुपालन करून घ्यावे.<br>**8.** संकीर्ण कर वसुली विभागाचा ना-हरकत दाखला न घेता परवाना / परवानगी दिल्याचे आढळून आल्यास, त्यामुळे होणाऱ्या महसूल नुकसानीची सर्वस्वी व वैयक्तिक जबाबदारी अग्निशमन विभागाची राहील. | |
| ९. | 1. लिलावानुसार विहित शुल्क महानगरपालिकेच्या पावतीद्वारे भरणा केलेल्या व्यापाऱ्यांनाच जागा वापराचा ना-हरकत दाखला द्यावा.<br>2. ना-हरकत दाखला दिलेल्या व्यापाऱ्यांची अद्ययावत यादी (नाव, जागा, स्टॉल क्र., पावती क्र. व दिनांक) तात्काळ अग्निशमन विभाग, अतिक्रमण विभाग, सर्व प्रभाग अधिकारी व नोडल अधिकारी यांना द्यावी.<br>3. तात्पुरत्या फटाके स्टॉलधारकांना केवळ हरित फटाके विक्री करण्याबाबत व स्टॉलवर जनजागृती फलक लावण्याबाबत लेखी सूचना द्याव्यात व त्याचा अहवाल नोडल अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावा.<br>4. यादीबाहेरील अनधिकृत स्टॉल अथवा मंजूर जागेपेक्षा जास्त जागा व्यापल्याचे आढळून आल्यास अतिक्रमण विभाग व | **संकीर्ण कर वसुली विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | प्रभाग भरारी पथकामार्फत नियमानुसार कार्यवाही करून घ्यावी. | |
| १०. | 1. घंटागाड्यांवरील ध्वनीक्षेपकांद्वारे जनजागृती संदेश प्रसारित करावेत. | **स्वच्छता / घनकचरा व्यवस्थापन विभाग** |
| ११. | 1. सार्वजनिक रस्ते, पदपथ व चौकांमध्ये विनापरवाना उभारलेल्या फटाके विक्री स्टॉल / अतिक्रमणांवर प्रभाग भरारी पथकांच्या समन्वयाने तात्काळ निष्कासनाची कारवाई करावी. | **अतिक्रमण विभाग** |
| १२. | 1. केलेल्या कार्यवाहीची छायाचित्रे, पंचनामे, नोंदी इत्यादी पुरावे जतन करून नोडल अधिकारी यांना वेळोवेळी सादर करावेत. | **सर्व विभाग प्रमुख** |

सर्व संबंधित अधिकारी यांनी उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नोडल अधिकारी यांना सादर करावा. सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयातील असल्याने उपरोक्त आदेश तात्काळ अंमलात येतील. कामकाजात हलगर्जीपणा अथवा विलंब झाल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची वैयक्तिक जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

Digitally signed by
Sunita Bhikan Kumawat
Date: 09-11-2026
20:16:10

**अतिरिक्त आयुक्त**
**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**

**प्रति,**

१. प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र. ०१, ०२, ०३ व ०४, मालेगाव महानगरपालिका.
२. मुख्य भांडारपाल, मालेगाव महानगरपालिका.
३. संबंधित विभाग प्रमुख (सर्व), मालेगाव महानगरपालिका.

**प्रत :- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी**

१. मा. उपायुक्त (सर्व), मालेगाव महानगरपालिका.

२. सहाय्यक आयुक्त (कर) तथा नोडल अधिकारी, मालेगाव महानगरपालिका.

**प्रतिलिपी :- माहितीसाठी सविनय सादर**

१. मा. जिल्हाधिकारी, धुळे तथा आयुक्त (अतिरिक्त कार्यभार), मालेगाव महानगरपालिका, मालेगाव.

२. मा. पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण / अपर पोलीस अधीक्षक, मालेगाव.

३. मा. उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक.

४. मा. सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.

५. मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई.

# मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

## जाहीर सूचना

**(मा. उच्च न्यायालय, मुंबई सुमोटो जनहित याचिका क्र. ०१/२०२६ अन्वये)**

---

मालेगाव शहरातील सर्व **नागरिक**, सार्वजनिक मंडळे, आयोजक, साऊंड **सिस्टीम**/डीजे चालक-मालक व फटाके विक्रेते यांना **याद्वारे** सूचित करण्यात येते की, सण-उत्सवांच्या काळात ध्वनीक्षेपक व फटाक्यांच्या अनियंत्रित वापरामुळे **होणाऱ्या** वायू व ध्वनी प्रदूषणाचा ज्येष्ठ नागरिक, **रुग्ण**, विद्यार्थी व लहान मुलांच्या आरोग्यावर गंभीर **दुष्परिणाम** होतो. यास्तव मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सुओ मोटो जनहित याचिका क्र. ०१/२०२६ **मध्ये** दिलेले आदेश वर्षभर व सर्व सण-उत्सवांना लागू असून त्यांचे काटेकोर पालन करणे सर्वांवर बंधनकारक आहे :-

१. **सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास संपूर्ण बंदी :** सार्वजनिक रस्ते, **गल्ल्या**, पदपथ व चौकांमध्ये फटाके फोडण्यास **पूर्णतः** बंदी आहे. उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ **गुन्हा** दाखल करून मुद्देमाल जप्त करण्यात येईल.

२. **शांतता क्षेत्र :** सर्व रुग्णालये, शाळा-महाविद्यालये, न्यायालये, धार्मिक स्थळे व विशेष घोषित ठिकाणांच्या १०० मीटर परिघात **ध्वनीक्षेपकांचा** वापर व फटाके वाजविण्यास कडक **प्रतिबंध** आहे.

३. **ध्वनीक्षेपक व साऊंड सिस्टीम :** सक्षम प्राधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय **ध्वनीक्षेपक**/साऊंड सिस्टीम वापरता येणार नाही. परवानाधारकांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी 'डेसिबल मीटर' बसविणे व साऊंड सिस्टीममध्ये 'इंटरनल साऊंड लिमिटर' जोडल्याचे प्रतिज्ञापत्र देणे सक्तीचे आहे. ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० नुसार रात्री १०.०० ते सकाळी ६.०० या वेळेत ध्वनीक्षेपक वापरण्यास मनाई आहे.

४. **ध्वनी मर्यादा :** ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० अन्वये विहित ध्वनी मर्यादा खालीलप्रमाणे आहेत :-

| अ. क्र. | क्षेत्र | दिवसा (स. ६ ते रा. १०) 'डेसिबल मीटर' | रात्री (रा. १० ते स. ६) 'डेसिबल मीटर' |
|---|---|---|---|
| १ | औद्योगिक क्षेत्र | ७५ | ७० |
| २ | वाणिज्य क्षेत्र | ६५ | ५५ |
| ३ | निवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| ४ | शांतता क्षेत्र | ५० | ४० |

५. **कारवाई :** नियमभंग **झाल्यास** संबंधित साऊंड सिस्टीम/डीजे/वाद्ये तात्काळ **जप्त** करून जप्त मुद्देमालासह पोलीस **प्रशासनामार्फत** कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

६. **हरित फटाके :** नागरिकांनी केवळ हरित फटाक्यांचा (Green Crackers) मर्यादित वापर करावा. फटाके विक्रेत्यांनी केवळ हरित फटाक्यांची विक्री करावी.

## तक्रार निवारण कक्ष (२४x७)

वरील आदेशांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी खालील ठिकाणी तक्रार नोंदवावी. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

| बाब | तपशील |
|---|---|
| नोडल अधिकारी (नाव व पदनाम) | नाव : श्री. नवल सोमा खैरनार<br>पदनाम : प्रभारी सहाय्यक आयुक्त (कर) |
| नोडल अधिकारी मोबाईल क्रमांक | मोबाईल क्र. : ८४५९३५६८१२ |
| हेल्पलाईन क्रमांक (२४x७) | (०२५५४) २३४५६७ |
| तक्रार कक्षाचे ठिकाण | अग्निशमन अधीक्षक, मुख्य अग्निशमन केंद्र, महेश नगर, छ. शिवाजी महाराज पुतळा, मालेगाव जि. नाशिक.<br>प्रभाग अधिकारी,०१, ०२, ०३, ०४, प्रभाग कार्यालय, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव जि. नाशिक. |
| मुख्य ईमेल आयडी | mlgmmc@gmail.com |
| पोलीस आपत्कालीन क्रमांक | ११२ |

| प्रभाग | प्रभाग अधिकारी / भरारी पथक प्रमुख | ई-मेल आयडी | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|
| प्रभाग क्र. ०१ | बळवंत बाविस्कर | wo.mmc1@gmail.com | ८४२११९३१७० |
| प्रभाग क्र. ०२ | संतोष गायकवाड | mmcofficen002@gmail.com | ९९६०१५९७०२ |
| प्रभाग क्र. ०३ | जगदीश बडगुजर | w3.mlgmmc@gmail.com | ८१८०८१३९५२ |
| प्रभाग क्र. ०४ | कादरी अब्दुल अलीम | w04.mmc@gmail.com | ९२७२७३२१३२ |
| मुख्य अग्निशमन केंद्र | संजय दादाजी पवार | chieffireofficermmc@gmail.com | ९८२३३३९२७५ |

सर्व नागरिकांनी पर्यावरणपूरक व शांततापूर्ण पद्धतीने सण-उत्सव साजरे करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**अतिरिक्त आयुक्त**
**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**

---

जा.क्र. मामनपा/ सं.क.व.वि./ २८८ /२०२६ दिनांक: ०६/११/२०२६

**प्रति,**

संपादक (मराठी/उर्दू),

---

उपरोक्त जाहीर सूचना आपले दैनिक वर्तमान पत्रात कमीत कमी जागेत एकवेळ प्रसिद्ध करून जाहिरातीचे बिल संकीर्ण कर वसुली विभागाकडे सदर करावे. जाहीर सूचना विहित तारखेस प्रसिद्ध न झाल्यास बिल अदा केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

जनसंपर्क अधिकारी
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव